## परिपत्रक क्रमांक 252

**विषय :- न्यास नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत देण्याबाबत .**

धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, मुंबई यांनी सार्वजनिक न्यास अधिनियम, 1951 खालील नियम 8(1) खाली न्यासाच्या प्रमाणपत्रांची दुसरी प्रत दोन किंवा जास्ती वेळा देता येईल का, याबाबत स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे संदेह व्यक्त केलेला आहे व अशा प्रकरणामध्ये सर्व विभागीय कार्यालयांत एकसूत्रीपणा रहावा म्हणून योग्य ते मार्ग दर्शन द्यावे अशी विनंती केलेली आहे.

नियम 8 (2) प्रमाणे एकदा दिलेली प्रमाणपत्रांची दुसरी प्रत हरवल्यास त्यानंतर प्रमाणपत्राची परत नक्कल उेदफच नये अशी तरतूद नाही. सबब, एकदा दिलेल्या दाखल्याची दुसरी प्रत हरवल्यावर अर्जदाराने त्या दाखल्याच्या प्रतीची नक्कल मागितल्यास ती त्यास त्याचे प्रतिज्ञापत्र घेऊन देण्यात यावी.

अ.शं.मेढेकर,
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

दिनांक 14 ऑक्टोबर, 1985.